महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानांतर्गत प्रशासकीय मंजूरी देण्यात आलेल्या पाणी पुरवठा व मलनि:स्सारण योजनांना अनुदान वितरीत करण्याबाबत.

रत्नागिरी नगर परिषद, जि. रत्नागिरी

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः सुनिअ- २०१४/प्र.क्र.३४१/पापु.२२
गो.ते. हॉस्पिटल संकुल इमारत, लोकमान्य टिळक मार्ग
मंत्रालय, मुंबई ४०० ००१
तारीख: २३ ऑक्टोबर, २०१७

वाचा :

१) **शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र. नापापु-२००८/प्र.क्र.१/पापु-२२,दि. २२.१०.२००८**
२) **शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,क्र.नापापु-२००८/प्र.क्र.१९८/पापु-२२, दि.२३.१२.२००८**
३) **शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,क्र.सुनिअ-२०१२/प्र.क्र.१५४/पापु-२२, दि.१५.३.२०१२**
४) **मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा, पुणे यांचे पत्र क्र. मु.अ.(प्रव्यससे) पुणे/ तांशा-१/रत्नागिरी/८८७, दि.१८.५.२०१२**
५) **शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,क्र.सुनिअ-२०१३/प्र.क्र.३५५/पापु-२२, दि.४.६.२०१३**

प्रस्तावना :

शासन निर्णय, दि.२२ ऑक्टोबर, २००८ अन्वये नागरी पाणीपुरवठा, मलनि:सारण, शौचालय बांधकाम व घनकचरा व्यवस्थापनासंदर्भात पर्याप्त, गुणवत्तापूर्ण सेवा, किफायतशीर सेवाशुल्कामध्ये उपलब्ध करुन देणे व विविध तांत्रिक, आर्थिक व व्यवस्थापकीय सुधारणा करण्याचे उद्दीष्ट निर्धारीत करुन महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियान राबविण्यात येत आहे. राज्यातील सर्व नागरीकांना पाणी पुरवठा व मलनि:सारणाच्या सर्वव्यापक सुविधा निश्चितपणे उपलब्ध करुन देणे हा महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

२. महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानांतर्गत, शासन निर्णय, दिनांक १५.३.२०१२ अन्वये रत्नागिरी शहर पाणी पुरवठा योजनेच्या रु. २२२.८८ लक्ष किंमतीच्या सुधारणा कामांस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा, पुणे यांनी संदर्भ क्र. ४ अन्वये रत्नागिरी शहर पाणी पुरवठा योजनेच्या एकूण रु.२,०५,०७,०१८/- इतक्या किंमतीच्या

सुधारणा कामाच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मान्यता दिली आहे. रत्नागिरी नगर परिषदेने स्वहिश्श्याची संपुर्ण रक्कम संबंधित बँक खात्यामध्ये जमा केली आहे. शासन निर्णय, दि.४.६.२०१३ अन्वये रुपये १००.२९ लक्ष अनुदान रत्नागिरी नगर परिषदेस वितरीत करण्यात आले आहे. मुख्याधिकारी, रत्नागिरी नगरपरिषद यांनी एकूण रुपये १०१.१४ लक्ष रकमेचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले आहे. कार्यकारी अभियंता (प्रभारी), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, रत्नागिरी यांनी मंजूर सुधारणा कामांपैकी, सार्वजनिक नळ कोंडाळे ग्रुप कनेक्शनमध्ये रुपांतरीत करणे व जलवाहिन्यांवरील गळत्या काढणे ही कामे नगर परिषद, रत्नागिरीने त्यांचे स्तरावर पूर्ण केली असल्याचे कळविले असुन सदर कामे वगळता इतर सुधारणा कामे ९७% पुर्ण झाली असल्याचा भौतिक प्रगती अहवाल सादर केला आहे. मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा,पुणे यांनी सदर योजनेस दिलेल्या तांत्रिक मान्यतेसोबतच्या गोषवाऱ्यामध्ये -बिलिंग व वसुलीचे संगणकीकरण या कामासाठी दर्शविण्यात आलेली रक्कम रु. ६,०७,७००/- तांत्रिक मान्यतेच्या किंमतीमधून वगळता तांत्रिक मान्यतेप्रमाणे योजनेची सुधारीत किंमत रु.१,९८,९९,३१८/- इतकी येत आहे. त्याप्रमाणे सदर योजनेस रु.१,७९,०९,३८६/- इतके अनुदान अनुज्ञेय आहे. रत्नागिरी शहर पाणी पुरवठा योजनेसाठी यापुर्वी रुपये १,००,२९,०००/- अनुदान वितरीत करण्यात आले असल्याने उर्वरित रु. ७८,८०,३८६/- अनुदान रत्नागिरी नगर परिषदेस वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानांतर्गत, शासन निर्णय, दिनांक १५.३.२०१२ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या रत्नागिरी शहर पाणी पुरवठा योजनेस अनुज्ञेय अनुदानापैकी उर्वरित अनुदान रु. ७८,८०,३८६/- (रुपये अठ्ठयाहत्तर लक्ष ऐंशी हजार तीनशे शहाऐंशी फक्त) पुढील विवरणानुसार वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(रक्कम रुपयांत)

शहराचे नांव	योजनेची एकूण किंमत	राज्य शासनाकडून अनुज्ञेय अनुदान (९०%)	नागरी संस्थेने निकषानुसार भरावयाची रक्कम (१०%)	नागरी संस्थेने भरलेली रक्कम	यापुर्वी वितरीत करण्यात आलेले अनुदान	आता वितरीत करावयाचे अनुदान
१	२	३	४	५	६	७
रत्नागिरी	१,९८,९९,३१८	१,७९,०९,३८६	१९,८९,९३२	१९,८९,९३२	१,००,२९,०००	७८,८०,३८६
एकुण रुपये						७८,८०,३८६

२. सदर योजनेअंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुज्ञेय होणाऱ्या सदर अनुदानावरील खर्च मागणी क्रमांक वाय-२, २२१५, पाणी पुरवठा व स्वच्छता, ०१ पाणी पुरवठा १९२, स्थानिक संस्था, नगर पालिका इत्यादींना सहाय्य - राज्य योजना - (०२) (०२) नगरपालिकांच्या (स्थानिक संस्था) पाणी पुरवठा व जलनि:स्सारण योजनांसाठी सहायक अनुदान (२२१५ १६४७), ३१ सहायक अनुदान (वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली करण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था यांनी सदर लेखाशिर्षाखाली शासनाकडून उपलब्ध करुन दिलेल्या अनुदानातून उक्त विवरणपत्रातील नमूद स्तंभ क्रमांक ७ मध्ये दर्शविल्याप्रमाणे संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना अनुदान वितरीत करावे, तसेच अनुदानाच्या या वितरणाचे स्वतंत्र लेखे ठेवावेत.

३. संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने योजनेसाठी स्वतंत्र लेखे ठेवावेत आणि योजनेचा प्रगती अहवाल व उपयोगीता प्रमाणपत्रे नियमितपणे वेळोवेळी शासनास सादर करावी.

४. महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानांतर्गत शासकीय अनुदान प्राप्त करुन घेण्यासाठी संबंधीत नागरी संस्थानी शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांक- नापापु २००८/प्र.क्र.१/पापु-२२, दिनांक २२ ऑक्टोबर, २००८ मधील तरतूदीचा अवलंब करणे आवश्यक राहील.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७१०२३१७२४०७५८२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sunil Jairam Tumram

Digitally signed by Sunil Jairam Tumram
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=873e6409c70b0a0219d717dd6767c9aec9dd2d61ecf0cc982e9e93ef57312675, cn=Sunil Jairam Tumram
Date: 2017.10.24 12:34:24 +05'30'

(सु.ज. तुमराम)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

- विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
- मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
- मा.मंत्री, (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
- मा.राज्यमंत्री (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
- अपर मुख्य सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग) यांचे स्वीय सहाय्यक,मंत्रालय, मुंबई.

- सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
- महालेखापाल १ -मुंबई/नागपूर.
- संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई.
- विभागीय आयुक्त, कोकण विभाग, नवी मुंबई
- जिल्हाधिकारी, रत्नागिरी
- मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा, पुणे.
- कार्यकारी अभियंता (प्रभारी), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, रत्नागिरी
- मुख्याधिकारी, रत्नागिरी नगर परिषद, जि. रत्नागिरी
- जिल्हा कोषागार अधिकारी, रत्नागिरी
- जिल्हा प्रकल्प अधिकारी, (नगरपालिका) जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी
- कक्ष अधिकारी, पापु.०४,पापु.२०,पापु.२१,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय, मुंबई.
- निवडनस्ती, पापु-२२.